## परीक्षेला जाताना

### विषय : राज्यशास्त्र

राज्यशास्त्र हा महत्त्वाचा विषय आहे. तो तत्त्वज्ञान आणि कायद्याशी निगडित आहे. या विषयाचा अभ्यास केवळ परीक्षेपुरताच नाही तर आयुष्यभर उपयोगी पडणारा आहे. परीक्षेत उत्तरलेखन करताना सुस्पष्टता आणि संदर्भ महत्त्वाचे ठरतात. यात घटनेची मूलतत्त्वे, राजकीय संकल्पना, विविध राज्यव्यवस्था, लोकशाही मूल्ये, हक्क आणि कर्तव्ये, तसेच आंतरराष्ट्रीय संबंध यांचा अभ्यास करावा लागतो. परीक्षेत चांगले गुण मिळवण्यासाठी केवळ पाठांतर करून उपयोग नाही, तर योग्य नियोजन, लेखनशैली आणि सखोल समज यांचीही आवश्यकता असते.

राज्यशास्त्राचा पेपर सोडवताना कोणत्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, पेपर कशा पद्धतीने सोडवावा आणि यासाठी कसा अभ्यास करावा, हे समजून घेतल्यास परीक्षेत अधिक चांगली कामगिरी करता येईल. राज्यशास्त्राची प्रश्नपत्रिका सोडवताना काही विशिष्ट पद्धती अवलंबल्यास परीक्षेतील तणाव कमी होतो आणि गुण सुधारण्यास मदत होते. सर्वप्रथम पेपर हातात आल्यानंतर घाईघाईने लिहायला सुरवात करण्याऐवजी संपूर्ण प्रश्नपत्रिका व्यवस्थित वाचावी. कोणते प्रश्न सोपे आहेत, कोणते अवघड आहेत? याचा अंदाज घेतल्यास वेळेचे योग्य नियोजन करता येते. जे प्रश्न तुम्हाला अगदी व्यवस्थित पाठ आहेत आणि ज्यांची उत्तरे तुम्हाला ठामपणे माहिती आहेत, त्यांना प्राधान्य द्या. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढतो आणि उत्तरपत्रिका व्यवस्थित सुरू होते.


सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 से आपके लिए "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

क्षेत्रीय कार्यालय - पहिला मजला, ओबेरॉय मालपानी टॉवर, शासकीय दुध डेअरी समोर, जालना रोड, औरंगाबाद

**निविदा मागविण्याची सूचना**

1. **परभणी शाखेच्या नवीन परिसर, परभणी** येथे फर्निशिंग, इलेक्ट्रिकल काम करण्यासाठी नामांकित टर्नकी विक्रेत्यांकडून वस्तु दराच्या आधारावर सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**2. निविदा सादर करणे:**

3. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख **21 फेब्रुवारी 2025 सायंकाळी 5.00 वाजेपूर्वी** बोली सीलबंद लिफाफ्यात सादर करावयाची आहे आणि "**परभणी शाखेच्या नवीन परिसर,** परभणी येथे फर्निशिंग, इलेक्ट्रिकल कामासाठीची निविदा स्पष्टपणे लिहिलेली असावी.

1.2 वरीलप्रमाणे सीलबंद निविदा सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कार्यालय, बिसनेस सपोर्ट विभाग, क्षेत्रीय कार्यालय, पहिला मजला, ओबेरियो- मालपाणी टॉवर, दूध डेअरी चौक, जालना रोड, छ. संभाजीनगर, 43 001 संध्याकाळी 5.00 पर्यंत, 21 फेब्रुवारी 2025 रोजी आणि त्याच दिवशी संध्याकाळी 5.30 वाजता उघडले जाईल.

1.3 कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेल्या निविदा आणि टेलिग्राफिक निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

1.4 निविदा उघडण्याच्या तारखेपासून कमीत कमी 30 दिवसांच्या कालावधीसाठी निविदा वैध असेल.

1.6 निविदेबाबत अधिक माहितीसाठी, क्षेत्रीय कार्यालयातील बिसनेस सपोर्ट विभाग, छ. संभाजीनगर (फोन क्र. 8180973822) येथे संपर्क करावा.

1.7 सर्वात कमी निविदा स्वीकारण्यास बँक बांधील राहणार नाही आणि कोणत्याही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवते.

**आदेशानुसार**
**क्षेत्रीय प्रमुख**
**क्षेत्रीय कार्यालय, छ. संभाजीनगर**